दिनांक : २० डिसेंबर, २०१७

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

**नूतन वर्षाच्या आपणांस हार्दिक शुभेच्छा!**

यावर्षी वृत्तपत्र विद्या पारंगत (एम.जे.) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय सत्रामध्ये संशोधन प्रकल्प (Research Project) सादर करावयाचा आहे. हा शोध निबंध १५ मार्च २०१८ पूर्वी विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे. या शोध निबंधासाठी शंभर गुण असून तो मुदतीत पूर्ण करणे अनिवार्य आहे.

या वर्षी शोध निबंधासाठी तीन विषय देण्यात येत आहेत. त्यापैकी एक विषय निवडून त्यावर सुमारे पंचवीस ते तीस पानांचा शोध निबंध लिहावयाचा आहे.

**शोध निबंधासाठीचे विषय आहेत :**

**१) देशाच्या अर्थव्यवस्थेवर नोटाबंदीचे सावट**

**२) गुजरात निवडणुकीचा राजकीय पक्षांना इशारा**

**३) शेतकऱ्यांच्या समस्या कशा सुटतील?**

शोध निबंधात काही आकडेवारी, तक्ते, आकडेवारीचे विश्लेषण, प्रश्नावली, मुलाखती, छायाचित्रे यांचाही आवश्यक तेथे समावेश असावा. विद्यार्थ्यांनी शोधनिबंध स्व–हस्ताक्षरात किंवा डीटीपी करून १५ मार्च २०१८ पूर्वी आपल्या केंद्रावर किंवा विद्यापीठाकडे सादर करावयाचा आहे.

यावर्षी विद्यार्थ्यांना देण्यात आलेले विषय अत्यंत महत्त्वाचे आहेत. **१)** गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटाबंदी जाहीर केली. नोटाबंदीमुळे काळा पैसा बाहेर येईल, अर्थव्यवस्था सुधारेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. प्रत्यक्षात वर्षभरानंतर नोटाबंदीने हाती फारसे काही लागले नाही, अशी सार्वत्रिक भावना निर्माण झाली आहे. अर्थव्यवस्था विस्कटली असतानाच सरकारने जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कर लागू केला. वर्ष–सहा महिन्यांत बसलेल्या या दोन्ही दणक्यांनी अर्थव्यवस्थेची गाडी रुळावरून घसरली. आर्थिक विकास मंदावल्याची कबुली प्रत्यक्ष केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दिली आहे. विरोधी पक्षांनी दिलेल्या इशाऱ्याकडे सरकारने दुर्लक्ष केले होते. अर्थव्यवस्थेच्या घसरणीला केवळ नोटाबंदी हेच एकमेव कारण आहे काय? नोटाबंदीच्या निर्णयाचे चांगले परिणाम भविष्यात जाणवतील असे वाटते का? परदेशी आणि देशांतर्गत आर्थिक घटकांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे का, अशी काही गृहीतके धरून हा शोध निबंध पूर्ण करावयाचा आहे.

विद्यार्थ्यांनी या संदर्भात वृत्तपत्रे, नियतकालिके यातून प्रसिद्ध झालेल्या माहितीचा आधार घेऊन संशोधन करायचे आहे. काही तज्ज्ञ व्यक्ती, सर्वसामान्य लोक यांच्या मुलाखतीच्या आधारेही काही निष्कर्ष विद्यार्थी काढू शकतील.

**२) गुजरात निवडणुकीचा इशारा –** डिसेंबरमध्ये पंतप्रधान मोदींचे गृहराज्य असलेल्या गुजरातमध्ये निवडणुका झाल्या. ही निवडणूक भाजप आणि काँग्रेस या दोन्ही राजकीय पक्षांसाठी प्रतिष्ठेची होती. गेली बावीस वर्षे असलेली सत्ता टिकवणे हे भाजपसमोर आव्हान होते, तर काँग्रेसचे नूतन अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासाठी काँग्रेसला या राज्यात उभारी देण्यासाठीचे आव्हान होते. निवडणुकीचा प्रचार कधी नव्हे तो खालच्या पातळीवर गेला. निवडणुकीचे निकाल लागले. भाजपला विजय मिळाला; पण जेमतेम शंभरी गाठताना त्या पक्षाची दमछाक झाली. भाजपची आणि मुख्यतः मोदी आणि शहा यांची प्रतिमा ढासळत आहे का? सरकारची धोरणे सर्वसामान्यांना आश्वासक वाटत नाहीत का? काँग्रेस नव्या नेतृत्वाखाली पुन्हा देशभरात उभारी धरणार याचे संकेत ही निवडणूक देते का? अशा काही गृहीतकांवर आधारित हा शोध निबंध असावा.

या निबंधातही या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, अग्रलेख याचा आधार घेऊन काही आकडेवारी, तक्ते, विश्लेषणे

यांचा समावेश शोध निबंधात असावा.

**३) शेतकऱ्यांच्या समस्या –** गेल्या वर्षभरात देशाच्या विविध भागांत शेतकऱ्यांची हमीभावासाठी आंदोलने झाली. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. शेतमालाच्या भावात ३० ते ४० टक्के घसरण झाली. त्याचा फटका सत्ताधारी पक्षाला बसला. शेतकऱ्यांचा असंतोष हे भाजपच्या शेतकरीविरोधी धोरणाचे कारण आहे. शेतकऱ्यांना स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी हवी आहे. शेतमालाला शाश्वत भाव मिळाला पाहिजे. भारतीय शेती अनिश्चिततेच्या भोवऱ्यात आहे. निसर्गाची अवकृपा, दुष्काळ, कर्जबाजारीपणा आणि पडते शेतमालाचे भाव अशा संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. या सर्व कारणांचा वेध घेऊन विद्यार्थ्यांनी शोधनिबंध लिहावयाचा आहे. शेतकऱ्यांचे मोर्चे, विधिमंडळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी भांडणारे विरोधी पक्ष असे चित्र आशादायक आहे का? यातून शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील का? शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे राजकीय पक्ष भांडवल करीत आहेत काय? या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला शोधायची आहेत.

या शोधनिबंधासाठीही वर्षभरात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, वार्तापत्रे, अग्रलेख, वेगवेगळ्या व्यासपीठावरून या संदर्भात झालेल्या चर्चा यांचा आधार घेता येईल. हा शोध निबंधही आकडेवारी, तक्ते, कात्रणे यांच्या साधार माहितीसह लिहावयाचा आहे.

**पर्यावरण अभ्यास**

एम.जे.च्या विद्यार्थ्यांना पर्यावरण हा विषय आहे. त्यासाठी ४० गुण अंतर्गत मूल्यमापनाचे म्हणजे असाइनमेंटचे असतील. त्याखेरीज विद्यार्थ्यांनी 'आपल्या परिसरातील वाढते प्रदूषण' या विषयावर सुमारे पंधराशे शब्दांचा शोध निबंध सादर करावयाचा आहे. हा शोध निबंधही १५ मार्च २०१८ पूर्वी विद्यापीठाकडे किंवा आपल्या केंद्रावर जमा करावयाचा आहे.

**रामदास नेहूलकर**
समन्वयक वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रम
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ